www.sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९७ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



## मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात सर्वाधिक रेव्ह पार्ट्या

# ट्रीपल इंजिन सरकार म्हणजे गुजरातला महाराष्ट्र लुटायला मिळालेली एन.ओ.सी – विजय वडेट्टीवार

**मुंबई**–अंमली पदार्थ, ड्रग्जमुळे प्रगतिशील, पुरोगामी राज्य बुडत चालले आहे. महाराष्ट्रात कायदा – सुव्यवस्था बिघडली आहे. गुटखा तंबाखू उघडपणे विकला जात आहे. रेव्ह पार्टी खुलेआम सुरू आहे. त्याकडे सरकारचे लक्ष नाही, असा आरोप विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पकड मुख्यमंत्री असताना जी होती, ती पकड उपमुख्यमंत्री झाल्यापासून सुटत चालली आहे. राज्यात सर्रास रेव्ह पार्टी सुरू आहे. मुख्यमंत्री यांच्या ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक रेव्ह पार्टी होत आहेत. एकंदरीत महाराष्ट्रातील राजकारणात चुल्लुभर पाण्यात डूब मारण्याची वेळ आली आहे. ती आता खरी होताना दिसून येत आहे.राज्यातील ट्रीपल इंजिन सरकार म्हणजे गुजरातला महाराष्ट्र लुटायला मिळालेली एन.ओ.सी आहे. आणखी किती प्रकल्प महायुती सरकार गुजरातला देणार आहे ते एकवेळ जाहीर करून द्यावे. राज्यातील प्रकल्प एका मागून एक गुजरातमध्ये जातात आणि मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री दिल्ली दरबारी फक्त सलाम ठोकायला जातात का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले येथील निवती रॉक येथे पाणबुडी पर्यटन प्रकल्प होणार होता; मात्र आता हा प्रकल्प गुजरातमधील द्वारका येथे होणार असून, पुढील महिन्यात होणाऱ्या 'व्हायब्रंट गुजरात समिट'मध्ये याबाबत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रिक वाहन उद्योगातील अमेरिकेची बलाढ्य कंपनी 'टेस्ला'चा प्रकल्प महाराष्ट्रात येणार होता; परंतु हा प्रकल्प गुजरातला पळवल्याचे शुक्रवारी वृत्त होते. यामुळे विरोधक आक्रमक झाले असून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रविवारी ट्विट करत सरकारवर निशाणा साधला.

# राज्य मराठी पत्रकार संघाचा अभिष्टचिंतन सोहळा १ जानेवारीला

## भद्रावती येथे विविध उपक्रमांचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष वसंत मुंडे, राज्य सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून १ जानेवारीला भदावती येथे जिल्हा शाखा चंद्रपूर ,तालुका शाखा भदावती तफे अभीष्टचिंतन सोहळा आयोजीत करण्यात आला आहे.

स्थानिक आशीर्वाद मंगल कार्यालयात दुपारी ११:३० वाजता आयोजीत कार्यक्रमाचे उदघाटन शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचे हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून राज्य पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष निलेश सोमानी, विदर्भ उपाध्यक्ष अनुपकुमार भार्गव, प्रसिद्ध उद्योजक नरेश जैन, शिक्षणतज्ज्ञ नाहिद हुसेन, करण देवतले, शिवा राव, अहेतेशाम अली, हे उपस्थित राहणार आहेत.या अभीष्टचिंतन सोहळ्यात दिनदर्शिका प्रकाशन,गुणवंतांचा सत्कार,पदाधिकारी मेळावा,अंध,अपंग विद्यार्थी यांना साहित्य वाटप,इत्यादी उपक्रम पार पडणार असून या सोहळ्यात जिल्यातील, तालुक्यातील पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भद्रावती तालुकाध्यक्ष शंकर बोरघरे,सचिव श्याम चटपल्लीवार, जिल्हा संघटक रुपचंद धारणे यांच्यासह तालुका शाखेचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# ना.मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे गुरुकुंज आश्रमाला विशेष बाब म्हणून 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

## ना.मुनगंटीवार यांनी ग्रामविकास मंत्र्यांकडे केला होता पाठपुरावा



### गुरूदेव भक्तांमध्ये आनंद

**यापूर्वी राष्ट्रसंतांचे नाव नागपूर विद्यापीठाला देण्यासाठी माननीय सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी विविध संसदीय आयुधांचा वापर करत सातत्यपूर्ण प्रयत्न विधिमंडळात आणि बाहेरही उभारत मोठी लढाई यशस्वी केली होती. हे सर्व गुरुदेव भक्तांच्या स्मरणात आहेत आणि आता गुरुकुंज आश्रमाला 'अ' तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्याने जगभरातील गुरुदेव भक्तामध्ये आनंद व्यक्त होत आहे.**

### ना.मुनगंटीवार यांचा पाठपुरावा

गुरुकुंज आश्रमाला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राच्या दर्जा मिळावा म्हणून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सुरुवातीपासून पाठपुरावा केला. ऑगस्ट २०२३ पासून त्यांनी यासाठी ग्रामविकास विभागाकडे पत्रव्यवहार गेला. त्यांच्या पत्रव्यवहारानंतर ग्रामविकास विभागाने प्रधान सचिवांना या संदर्भात तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानुसार अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासंदर्भात ग्रामविकास विभागाला प्रस्ताव सादर केला.

### अंतिम मंजुरीसाठी पत्र

**अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव शासनाला सादर केल्यानंतर ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी ग्रामविकास विभागाचे या संदर्भात लक्ष वेधले. त्यानुसार २८ डिसेंबर २०२३ रोजी ग्रामविकास विभागाने गुरुकुंज आश्रमाला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान केला.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लाखो गुरूदेव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गुरूकुंज आश्रमाला विशेष बाब म्हणून 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी यासाठी ग्रामविकास मंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता.

अमरावती येथील गुरूकुंज आश्रम जगाच्या कानाकोपऱ्यातील गुरूदेव भक्तांसाठी महत्त्वाचे स्थान आहे. थोर विभूती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची येथे समाधी आहे. राष्ट्रसंतांनी राष्ट्रभक्ती, जागृती, अंधश्रद्धा-जातीभेद निर्मूलन, ग्रामविकास यासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांच्याद्वारे लिखित ग्रामगिता अनेकांना जीवन कसे जगावे यासाठी प्रेरणा देते. मध्यप्रदेश व महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना स्वातंत्र्य संग्राम सैनिक म्हणून गौरविले आहे. १९५३ मध्ये गुरूकुंज मोझरी येथे राष्ट्रसंतांनी आश्रम स्थापन केले. हा केवळ आश्रम नसून गुरूदेव भक्तांसाठी ऊर्जास्रोत आहे, असे ना. श्री. मुनगंटीवार यांनी आपल्या पत्रात नमूद केले होते.राष्ट्रसंतांच्या या कार्याला 'अ'वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, अशी आग्रही मागणीही त्यांनी ग्रामविकास मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातून केली होती. त्यानुसार ग्रामविकास विभागाने २८ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे महासमाधी स्थळ श्रीक्षेत्र गुरूकुंज आश्रमाला 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्रदान केला आहे. शासनाला यासंदर्भात विशेष बाब म्हणून तीर्थक्षेत्राला 'अ' दर्जा मिळवून दिल्याबद्दल गुरूकुंज आश्रम व गुरूभक्तांकडून सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त होत आहेत.

## देशाच्या प्रगतीसाठी गाव विकसीत होणे गरजेचे

# कोंडेखल (ता.सावली) येथे संकल्प यात्रेत जिल्हाधिकाऱ्यांचा गावकऱ्यांशी संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने सुरू केलेली विकसीत भारत संकल्प यात्रा चंद्रपूर जिल्ह्यात गावागावात जावून लोकांना शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती देत आहे. गावक-यांनी सुध्दा या योजनांचा लाभ घेऊन आपल्या गावाच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न करावे. गाव विकसीत झाले तरच आपला देश प्रगतीच्या वाटेवर अग्रेसर राहील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.



सावली तालुक्यातील कोंडेखल येथे विकसीत भारत संकल्प यात्रेत गावकऱ्यांशी संवाद साधतांना ते बोलत होते. यावेळी तहसीलदार परीक्षित पाटील, गटविकास अधिकारी मधुकर वासनिक, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, तालुका आरोग्य अधिकारी धनश्री अवगड, गटशिक्षणाधिकारी संध्या कोनपतिवार, विस्तार अधिकारी संजीव देवतळे, सरपंच सरला कोटांगले, उपसरपंच बबन बावनवाडे, ग्रामसेवक आनंद देवगडे आदी उपस्थित होते.गावकऱ्यांसोबत संवाद साधतांना जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, विकसीत भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून लोकांपर्यंत शासकीय योजना पोहचविणे, योजनांपासून वंचित असलेल्यांना लाभ मिळवून देणे, ज्यांना लाभ मिळाला आहे, अशा नागरिकांचे अनुभव इतरांपर्यंत पोहचविणे, यासाठी ही संकल्प यात्रा एक महत्वाचे व्यासपीठ आहे. गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी पहिले स्वत:मध्ये बदल करावा, त्यानंतरच आपण आपल्या गावामध्ये बदल घडवू शकतो. तुमचे उत्पन्न, मुलांचे शिक्षण, आरोग्याच्या सुविधा यासाठीसुध्दा गावक-यांनी आग्रही राहावे. विकसीत भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा, कारण गाव विकसीत तरच देश विकसीत होईल, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाच्या सुरवातीला जिल्हाधिका-यांनी विविध विभागांच्या स्टॉलला भेट दिली. तसेच या स्टॉलच्या माध्यमातून लाभार्थ्यांना काय माहिती दिली जाते, हे जाणून घेतले. यावेळी वैयक्तिक लाभाच्या योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर, आयुष्मान कार्ड, मोदी आवास योजना घरकुल मंजुरीचे पत्र आदींचे लाभार्थ्यांना वाटप केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक गटविकास अधिकारी वासनिक यांनी तर आभार तहसीलदार परिक्षीत पाटील यांनी मानले. यावेळी राजू परसावार, बंडू मुरकुटे, तालुका अभियान व्यवस्थापक कल्पना देवडाळकर, शुभम श्रीकोंडावार, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी भक्तदास आभारे, प्रशांत भोयर, संजय दुधबळे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# ॥ हार्दिक अभिष्टचिंतन ॥



श्री.स्वामी शिरकुल वैदू (मुंबई उपनगरे प्रमुख) | डॉ.विश्वासराव आरोटे (प्रदेश सरचिटणीस) | श्री.वसंतराव मुंडे (प्रदेश अध्यक्ष) | श्री.संजय भोकरे (प्रदेश संघटक) आमचे मार्गदर्शक

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष **मा.श्री.वसंतराव मुंडे,** तसेच प्रदेश सरचिटणीस **डॉ.विश्वासराव आरोटे** व मुंबई उपनगरे प्रमुख **श्री.स्वामी शिरकुल वैदू** यांना वाढदिवसानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा**

-: शुभेच्छूक :-

**आशिष मारोती घुमे**

संपादक दैनिक सह्याद्रीचा राखणदार तथा आजीवन सदस्य महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ



सह्याद्रीचा राखणदार



# नवे वर्ष, नवा संकल्प

**नवीन वर्षाच कॅलेंडर बदललं की वाटतं, आपलं आयुष्यही असच नवं झालं आहे. दररोजच्या जगण्यातला तोचतोचपणा संपला आहे, मनाला वाटतं, झालं! मागल्या वर्षी राहून गेलेली स्वप्ने, यावर्षी पूर्ण होतील. गतकालीन अपूर्ण स्वप्ने नव्या वर्षात वास्तवात घडेलं असं वाटत. मागचे हिशोब चुकते होतील असेही वाटते. नव्या वर्षात नवी स्वप्नं,नवे क्षितीज पादाक्रांत होईल असे वाटते. यानिमित्ताने नवनवीन स्वप्न पडायला लागतात काही पूर्वीचीच तर काही नवी.**

घड्याळाचे दोन्ही काटे १२ या आकड्यावर येऊन थांबल्यानंतर शहरभर हॅपी न्यू इयर चा जल्लोष झाला असेल. त्यानंतर आप्तस्वकीय, नातेवाईक, मित्रमंडळींना हॅपी न्यू इयर, नवे वर्ष सुखाचे आणि आनंदाचे जावो अशा आशयाचा शुभेच्छा संदेशही पाठवला असेल. अलीकडे तरुण असो की म्हातारे असो सर्वांनाच जुन्या वर्षाला निरोप देत असताना आणि नवीन वर्षाचे स्वागत करत असताना थर्टी फर्स्ट इयर पाळण्याची परंपरा सुरू केलेली आहे. यात अनेक आबालवृद्ध सहभागी होऊन आपापल्या परीने आनंद व्यक्त करीत असतात.

प्रासंगिक



डॉ.यशवंत घुमे
मो. ९८२२२३३११२
sahyandrinews@gmail.com

कालच्या म्हणजे ३१ डिसेंबरच्या रात्री अनेकांनी चिकन, मटन च्या हाडांसोबत विविध प्रकारच्या पेयांचा स्वाद घेत जुन्या वर्षाला निरोप दिला असेल.याला काही अपवाद पण होते. १जानेवारी म्हणजे आजपासून अनेकांनी मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेण्याचा संकल्प केला असेल आणि देवा मला सद्गुण दे. चांगले काम करण्याची प्रेरणा दे असेही परमेश्वराकडे मागणं मागितले असेल. एकंदरीत आजचा हा पहिला दिवस आस्तिक आणि नास्तिक या सगळ्यांसाठी नवीन प्रेरणा देणारा आहे. या दिवसापासून सगळ्यांनी प्रेरणा घेऊन आपल्या आयुष्य उज्वल आणि सार्थकी कसे लावता येईल या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आपण सगळे आज नव्या वर्षात प्रवेश करीत आहोत. ही सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. जुने सोडून नवीन धारण करणे सर्वांनाच आवडते. सरलेल्या २०२३ या वर्षात आपण ज्या चुका केल्या, जे वाईट अनुभव आले, ज्या नकारात्मक भावना आल्या त्या सर्व दूर किनाऱ्यावर ठेवून आजपासून आपण २०२४ कडे मार्गक्रमण करीत आहोत. आज १ जानेवारीपासून नवीन वर्षाला आपल्या मनोवांच्छित संकल्पांना सुरुवात करायची आहे. हा संकल्प अनेक दिवसांपासून ठरविलेला असेल. अनेकांनी नवीन वर्षाच्या स्वागताची जोरदार तयारी केली असेल. या नव्या वर्षासोबत वाईट सवयी, वाईट अनुभव मागे सोडण्याचा निर्णय घेतला असेल. पाठीमागे घडलेल्या चुका सोडून नव्या उमेदीने समोर जायचं संकल्प मनाशी बांधला असेल.

जगभरामध्ये अनेक देशांमध्ये आजचा दिवस इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे नवीन वर्ष म्हणून धुमधडाक्यात साजरा केला जातो. अनेकांनी धुमधडाक्यात साजरा केलाही असेल याबाबत यत्किंचितही शंका नाही. १ जानेवारीला सुरू झालेले हे नवीन वर्ष इंगजी भाषेची देण असली तरी पहिल्याच दिवशी सगळीकडे आनंदीआनंद देऊन गेला असेल अशी अपेक्षा करूया. पहिल्या दिवशी आनंद साजरा केला म्हणजे अखख वर्ष आनंदात जाईल अशी या मागची भावना असते. या नव्या संकल्पनेच्या माध्यमातून आपण आपल्या मनातील नवीन स्वप्ने, नवीन उद्दिष्ट्ये,नवीन कल्पना यांना साज चढवून त्यांना विशिष्ट आकार देण्याचा प्रयत्न करतो.

नवीन वर्षाची सुरुवात ही आपल्याला बदलत्या जीवनमानप्रमाणे जगण्याचा संदेश देत असते. दररोज पुढे जाण्याची प्रेरणा देते. चुकांमधून आपल्याला सुधारणा करण्याची संधी देते. सिंहावलोकन करण्याची संधी देते. सिंहावलोकन करणे म्हणजे मागे वळून बघणे होय. आपण सिंहाला राजा समजतो. का? तर त्याच्यामध्ये एक विशेष गुण असतो. असे सांगण्यात येते की, दर साडेबारा कोस पुढे चालून गेल्यानंतर सिंह मागे वळून पाहतो. मागे वळून बघताना आपण काय चुका केल्या यावर विचार करतो असे म्हणतात. काही धोका नाही याची खात्री पटली की तो पुढे मार्गक्रमण करतो. सिंहाच्या या वागणुकीवरून सिंहावलोकन हा शब्द भाषेमध्ये आला असावा असे वाटते.

अनेक लोक आजच्या नव्या वर्षाच्या सुरुवातीला पहिल्या दिवशी सिंहावलोकन करून भूतकाळात झालेल्या चुका दुरुस्त करून त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेत असतात. पुढे मार्गक्रमण करीत असतात. माणूस आशावादी प्राणी आहे. तो आशेवर जगतो. निराशेला मागे सोडून उदासीनतेवर कर्तुत्वाचे फवारे सोडून आपल्या जगण्याला दिशा देतो. गतकाळातील कळत नकळत झालेल्या चुकांवर पांघरूण घालतो. इच्छेविरुद्ध जे घडले ते विसरून जाऊया आणि आपल्या जगण्याला नवी दिशा देऊया अशी मनोभावे प्रार्थना करत आजच्या या नववर्षाच्या दिवसापासून नवीन संकल्प केले, नवीन प्रस्ताव मनामध्ये कोरले असेल.सवयीप्रमाणे आपण नव्या वर्षी मी असे करीन, मी तसे करीन असा निर्धार केला असेल. नवनवे संकल्प केले असेल. आजच्या १ तारखेपासून नववर्षाच्या शुभ मुहूर्तावर आपल्या जीवनात दिशा, आपल्या संकल्पनांना दिशा देण्यास हरकत नाही. गतकाळात झालेल्या चुकांवर पांघरूण घालून नवे संकल्प, नव्या आशा पल्लवीत करून त्या दिशेने मार्गक्रमण करण्याचा या निमित्ताने संकल्प करूयात.

## मलेझरी येथील भव्य ग्रामीण कबड्डी सामन्याचे माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते उदघाटन

**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मलेझरी येथे आदिवासी गोंड गोवारी युवा संघटना यांच्या कडून आयोजित भव्य ग्रामीण कबड्डी सामन्याचे उदघाटन भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष व माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले. कबड्डी सामन्यांच्या उदघाटन पूर्वी गावात माजी आमदार दिपक आत्राम यांचा आदिवासी पारंपारिक वाद्याच्या गजरात भव्य मिरवणूक काढून राष्ट्रीय शहीद विरबाबुराव शेडमाके,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केल्यानंतर मैदानात जाऊन उदघाटन करण्यात आले.





या उदघाटन सोहळ्याला सह उदघाटक म्हणून माजी जि.प.सदस्या अनिता दिपक आत्राम,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार कुबडे ,प्रमुख पाहुणे म्हणून मूलचेरा नगरपंचायत च्या नगरसेविका सुनीता रमेश कुसनाके,पोलीस पाटील मारिया कोरडे,वेलगुर ग्राप उपसरपंच उमेश मोहूर्ले,डॉ अंकित झाडे,ग्रा.प.सदस्य विजय मांदाळे,ग्रा.प.सदस्य संदीप चौधरी,ग्रा.प.सदस्य विनोद झाडे,आविस जेष्ठ सल्लागार रामचंद्र शेडमाके,आविस जेष्ठ सल्लागार भगीरथ गायकवाड ,साईनाथ नागोसे,किशोर नेवारे,रामदास सिडाम,वामनराव कन्नाके,रामदासजी कोसनकर,किसन येलमुले,बंडू चांदेकर,हिरामण चौधरी,शिवदास झाडे,सुखदेव दुधे,दिलीप चल्लावार,तंटामुक्त अध्यक्ष धर्मपाल गोंगले, राहुल दुधे,संजय शेडमाके,गौतम चांदेकर,दिगंबर परचाके,रमेश मडावी,तुफिन गायकवाड,प्रवीण रेषे सह आविस व बीआरएस चे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माजी आमदार दिपकदादा आत्राम यांनी कबड्डी खेळाविषयी उपस्थित खेडाळु व नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले.कबड्डी सामन्यात दोन गट ठेवले असून गट अ साठी प्रथम पुरस्कार माजी आमदार दिपकदादा आत्राम यांच्या कडून तर गट ब साठी प्रथम पुरस्कार अनिता दिपक आत्राम माजी जि.प.सदस्या यांच्याकडून असे एकूण तीन बक्षीस ठेवण्यात आले.आदिवासी गोंड गोवारी युवा संघटना यांच्या कडून आयोजित भव्य कबड्डी सामन्याचे उदघाटनीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बंडुजी बावणे यांनी मानले.या कबड्डी सामन्याचे उदघाटनीय सोहळ्याला मलेझरी, अडपल्ली सह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. सामन्याच्या यशस्वीतेसाठी दिपक शेडमाके,आकाश नागोसे,मारोती मडावी,जितेंद्र परचाके,सचिन राऊत,राहुल कोहट,प्रणय शेडमाके,आकाश राऊत,शेखर पोरेते,स्वप्नील सुरपाम,मयूर बावणे यांनी परिश्रम घेतले.



## TENDER NOTICE

**Supply, Installation of Tractor 4 WD 30 HP, Seed drill 7 Tines. Rotavator (4.5 ft.)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Nandori Farmer Producer Company ltd.** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above- mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart- mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **12-01-2024 up to 1:00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Nandori Farmer Producer Company itd.**
**At-Nandori, Ta- Bhadrawati, Dist- Chandrapur**
**(M.S)442907**


## यशवंतपुर कोरबा वैनगंगा एक्सप्रेस देसाईगंज(वडसा)रेल्वे स्टेशन थांबा मंजूर

### खा.अशोक नेते यांनी केलेल्या प्रयत्नाला अखेर यश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली- चिमूर लोकसभा क्षेत्रातील एकमेव रेल्वे स्टेशन देसाईगंज (वडसा ) आहे.या परिसरात मोठया प्रमाणात व्यापाऱ्यांची व प्रवाशांची वर्दळ असते.कोरोना च्या दरम्यान सुपरफास्ट व पॅसेंजर सर्वच गाडया बंद होत्या.परंतु नंतर कोरोना शिथिलतेनुसार संपुर्ण गाड्या चालू झाल्या.कोरोना च्या अगोदर कोरबा यशवंतपुरम वैनगंगा सुपरफास्ट ट्रेनचा थांबा (स्टापेजेस) देसाईगंज ( वडसा) येथे होता.परंतु कालांतराने देसाईगंज ( वडसा) येथे थांबा बंद केल्याने प्रवासी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होऊन रोष व्यक्त केला जात होता.



याकरिता देसाईगंज (वडसा) या ठिकाणी अनेक दिवसांपासून ची व्यापाऱ्यांची, विद्यार्थ्यांची, नागरिक जनतेची, शेतकऱ्यांची, प्रवाशांची रेल्वे स्टेशनवर स्टापेजेस थांब्याची मागणी होती. खासदार अशोक नेते यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना दिल्ली येथे वारंवार भेट घेऊन चर्चा करुन निवेदन देण्यात येत होते.यासाठी प्रयत्न सुद्धा केल्या जात होता. या केलेल्या प्रयत्नाला अखेर यश येऊन देसाईगंज (वडसा )रेल्वे स्टेशनला १२२५१/१२२५२ यशवंतपुर कोरबा वैनगंगा एक्सप्रेस देसाईगंज (वडसा )रेल्वे स्टेशन थांबा देण्याची मागणी मान्य केली असून लवकरच हिरवी झेंडी दाखवुन शुभारंभ होईल अशी माहिती खासदार अशोक नेते यांनी दिली.या स्टापेजेस थांब्यामुळे निश्चितच या क्षेत्रातील व्यापारी, व्यावसायिकांना, विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, जनतेला,प्रवाशांना याचा फायदा होईल.असे वक्तव्य खासदार अशोक नेते यांनी करत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे थांबा मंजूर केल्याने आभार व हार्दिक अभिनंदन केले.

## शासकीय योजनांच्या लाभासाठी जलजीविका संस्था कार्यरत



**वर्धा । प्रतिनिधी**

शासकीय योजनांचा लाभ गावा-गावात पोहोचावा व या योजनांचा लाभ गावातील प्रत्येक नागरीकांपर्यन्त पोहोचवा या उद्देशाने जलजीविका संस्था तालुका स्तरीय अभियान राबवत आहे.

असेच अभियान सेलू तालुक्यामधील जयपूर या गावामध्ये राबवले गेले,ज्यामध्ये गावातील नागरिकांसाठी जलजीविका संस्थेद्वारे ई श्रम कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढण्याचा कॅम्प ग्रामपंचायत, जयपूर येथे आयोजित करण्यात आला होता. आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करण्याची पूर्व सूचना ग्रामस्थाना दिली गेली असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांचे यशस्वीरीत्या ई श्रम कार्ड व आयुष्य मान भारत कार्ड काढण्यात आले. तसेच जलजीविका संस्थेच्या वतीने जयपूर येथे असलेल्या दोन अंगणवाडीला वॉटर फिल्टर देण्यात आले. गावातील सरपंच किरण आबुलकर व आशा वर्कर सविता सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाला विशेष सहकार्य केले. सदर कार्यक्रमाला जलजविका संस्थेचे (प्रशिक्षण समन्वयक) दामिनी अखंड आणि प्रियंका झोड, गणेश तुळसकर( जिल्हा समन्वयक जलजीविका ) ग्रामपंचायत सदस्य वर्षा वाघाडे दिलीप मस्के इ. उपस्थित होते.

# राज्य आपत्ती व्यवस्थापन शिबिर आव्हान मध्ये विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह

## एन.डी.आर.एफ.चमू कडून तलावावर दाखविण्यात आले प्रात्याक्षिक

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने सुरू असलेल्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आव्हान शिबिरात आजच्या सहाव्या दिवशी दिवसभरात पूरपरिस्थितीत कसा बचाव करायचा, भूकंप, आग, यापासून स्वतःचे आणि इतरांचे संरक्षण कसे करायचे याविषयी मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक निरीक्षक पंकज चौधरी यांच्या नेतृत्वाखाली एन. डी. आर. एफ च्या चमूद्वारा देण्यात आले.

प्रात्यक्षिकाद्वारे एखाद्या ठिकाणी आग लागल्यानंतर कशाप्रकारे आगीवर नियंत्रण मिळवुन आगीत अडकलेल्या लोकांची मदत करतात याबाबत प्रात्यक्षिक सादर केले. यासोबतच विदयार्थ्यांनी स्वतः प्रात्याक्षिक करुन अनुभव घेताला.या प्रशिक्षण शिबिरात इतर विद्यापीठांचे कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले असून दर दिवशी सत्राचे संचालन करण्याची जबाबदारी एका विद्यापीठाकडे असते. दररोज सकाळी व्यायाम आणि योगाने विद्यार्थ्यांच्या सत्राची सुरुवात होत असते. जेवणाच्या आधीही विद्यार्थी प्रार्थना करतात.एन. डी. आर. एफ. चे अधिकारी यांच्या संपूर्ण टिमने पुर परिस्थिती उद्भवल्यास आपत्ती



व्यवस्थापन व निवारण दल कशा पद्धतीने लोकांना मदत करतात याचे स्थानिक तलावावर प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. यामध्ये बोटी, लाईफ सेव्हिंग जॅकेट व पीसीआर इत्यादी पद्धतीचा अवलंब करुन पुरात अडकलेल्या नागरिकांना सुखरुप कशाप्रकारे बाहेर काढण्यात येते तसेच पूरपरिस्थितीत बोटीत कसे बसायचे, निरुपयोगी वस्तूंपासून बचावाची साधनं कशी तयार करायची याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला .दारू पिणे म्हणजे कुल आणि फॅशन असे समजणारे मुर्ख आहेत, दारूमुळे आयुष्य उध्वस्त होते, असे प्रतिपादन ' निर्माणचे प्रकल्प प्रमुख तसेच सर्च संस्थेचे सहसंस्थापक अमृत बंग यांनी केले. गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आपत्ती निवारण शिबीर 'आव्हान २०२३' मध्ये कालच्या सत्रात त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी देशात दररोज मृत्यु होणाऱ्यांपैकी २५ ते २९वयोगटातील २५टक्के मृत्यु दारू पिल्यामुळे होतात. गेल्या २० वर्षात ५५ टक्के दारूची विक्री वाढली आहे. दारूमुळे केवळ व्यक्तीचे नुकसान होत नाही तर समाज आणि देशाचेही नुकसान होते. त्यामुळे दारू पिणार नाही आणि दारू पिणाऱ्या व्यक्तीशी लग्न करणार नाही, अशी शपथ विद्यार्थ्यांना दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अमृत बंग यांनी दिली. त्यांच्यासोबत आदिती पिदूरकर, ओजस कृष्णानी, साईराम गजेले, विशाल बंडीवार, प्रज्जल सोनालवार आदी उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# राज्य पत्रकार संघाचे मिरर मॅन मा.डॉ.विश्वासराव आरोटे

राज्य पत्रकार संघाचे दोन सेनानी सर्वश्रुत आहेत. एक सर्वमान्य नेतृत्व असलेले मा. वसंत मुंडे व दुसरे मिरर मॅन ठरलेले संघाचे राज्य सरचिटणीस मा. डॉ. विश्वासराव आरोटे. संघाचा प्रत्येक घटक, पदाधिकारी, संघटनेच्या सुरेल संचालना संबंधाने या दोन्ही प्रतिभावंताकडे एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणून बघत असतो.जमिनीवर पाय टेकणारा, संघटनेच्या सर्वात शेवटच्या घटकाशी नाळ जुळलेला संघटनेचा बोलका चेहरा, मिरर मॅन म्हणजे आमचे राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस मा. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर गोवा, कर्नाटक, गुजरात ते दिल्ली पर्यंत राज्य पत्रकार संघाचे साम्राज्य पसरविण्यात मा. आरोटे साहेबांचे योगदान अगदी स्पष्ट आहे. प्रदेशाध्यक्षांचे सोबतीने काम करणारा हा जिद्दी, चंचल, मेहनती म्होरक्या संघटनेची ओळख बनून गडचिरोली ते गोवा पर्यंतच्या सदस्यांचे हृदयात वसला आहे.



प्रा.महेश पानसे
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ
पूर्व विदर्भ अध्यक्ष

संघात खालून वरपर्यंत संवाद साधताना मा. आरोटे साहेबांचे कार्य, तळमळ अगदी निखळपणे पत्रकारांच्या हितासाठीच असल्याचे स्पष्टपणे जाणवते. आरोटे व राज्य पत्रकार संघ असे एक समिकरण तयार झाले म्हटल्यास नवल नसावे. संघटनेच्या प्रत्येक घटकांबाबत असलेली आंतरिक तळमळ मा. आरोटे साहेबांच्या अविरत धावपळीतून लक्षात येते. संघटनेतील प्रत्येक घटकाने, सदस्याने ही तळमळ सांभाळून, जोपासून पुढाकार घेतला तर खंऱ्या अर्थाने मान, आरोटे साहेबांच्या कार्याचा गौरव होणार आहे. मान, संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनात पत्रकार संघ सांभाळण्याची सक्षमता च सहजता लाभलेल्या पहिल्या फळीतील दोन मुत्सद्द्यांना मी अनुभवले आहे. मान. वसंत मुंडे व मान. विश्वासराव आरोटे. संघटन साफल्यासाठी



धावपळ व संघटन कौशल्य यातून अलंकारीत झालेले मिरर मॅन म्हणजे आमचे राज्य सरचिटणीस मा. विश्वासराव आरोटे. सर्वसामान्य सदस्य व पत्रकारांना मा. आरोटे साहेबांची संयमी, प्रामाणिक धडपड आदर्शवत ठरावी अशीच आहे. पत्रकार संघाचे खऱ्या अर्थाने नेतृत्व करणाऱ्यांना सतत काटेरी मुकुट शिरावर घेऊन मागेपुढे चालावे लागते. प्रचंड ऊर्जा खर्च करावी लागते कारण पत्रकारांचे पत्रकारितेती घटकांचे प्रश्न सोडविताना पुढे पुन्हा अनेक प्रश्न उभे ठाकतात व प्रश्नांची उकल करून शासन दरबारी उत्तरे सुद्धा आपणच सादर करावी लागतात. या विचित्र चक्रव्युहातून स्वतः सोबत संपूर्ण संघाला सावरून सन्मानित करण्याचे श्रेय मा. आरोटे साहेबांना सुद्धा जाते व यामुळेच ते राज्य पत्रकार संघाचे Mirrorman ठरले आहेत.

राज्य पत्रकार संघात Quantity Quality यांची सांगड घालण्यात जे मोठे यश पदाधिकाऱ्यांना मिळाले आहे. यात प्रदेशाध्यक्ष मान, बसंत मुंडे यांच्यासह मा. विश्वासराव आरोटे यांचाही मोठा वाटा आहे. पत्रकार सृष्टीच्या समस्या शासनस्तरावर सतत भांडून सोडवाव्या लागतात. एकीकडे शासन दरबारी भांडताना दुसरीकडे सामाजिक सहकार्य संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रमातून पदरी पाडून घेण्याचे कौशल्य शिकविण्याचे महतकार्य मान. आरोटे साहेब यांनी केले आहे. राज्य पत्रकार संघ ३६५ दिवस वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमातून आपली सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. मान, आरोटे साहेबांची कल्पकता, मेहनत, क्षमता किंबहुना एकत्रित व्यक्तिमत्व व संघातील हजारो पदाधिकारी व सदस्यांना लाभणारे त्यांचे मार्गदर्शन हे आमचे सोभाग्य, त्यांच्या कधनी व करणीतून संघटनेतील प्रत्येक घटकाला ऊर्जा मिळत आहे.मिरर मॅन ठरलेल्या मान, आरोटे साहेबांचे योगदान संघासाठीच नाही, तर राज्यभरातील पत्रकारांसाठी मोठे आहे.राज्य पत्रकार संघाच्या व्यासपीठावरून समाजातील इतर घटकांकरीता जनसेवेचे व्रत जोपासण्याची शिकवण आरोटे यांच्या कर्तृत्वातून आम्हालामिळत आहे. संघमीवृत्ती, चंचलता, सेवाभाव व जलदगती कार्य या गुणविशेषाने मा. विश्वासराव आरोटे मिरर मॅन या उपाधीवर तंतोतंत उतरतात.अल्पवयात आगळीवेगळी पत्रकारीता, संघटनकला, दांडगा संपर्क साधणारा हा सेवाभावी पत्रकार म्हणजे राज्य पत्रकार संघाची शान ठरावा.

## आल्लापल्ली येथील आय्यप्पा स्वामी मंदिर येथे राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी घेतले दर्शन

**अहेरी । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे यंदाही आल्लापली येथे आय्यप्पा स्वामी मंदिर येथे महापडीपूजा तथा अग्निगुंडम कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यानिमित्ताने राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी आय्यप्पा स्वामी पूजेला उपस्थित राहून दर्शन घेतले.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा आलापल्ली येथील आय्यप्पा स्वामी मंदिर येते वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला .यावेळी राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी आय्यप्पा स्वामी मंदिरात जाऊन आय्यप्पा स्वामीला साकडे घातले व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व नागरिकांना सुख, शांती व उत्तम आरोग्य



लाभावे अशी आय्यप्पा स्वामी कडे प्रार्थना केले.यावेळी भाजपचे पदाधिकारी व आय्यप्पा स्वामी भक्तजन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवराव भोंगळे यांची अधिकाऱ्यांसमवेत भूस्खलनग्रस्तांच्या पुनर्वसन नियोजित जागेला भेट

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील भूस्खलनग्रसतांच्या पुनर्वसनासाठी नियोजित वेकोलि वसाहतीच्या शिवनगर जवळील जागेची व सफाईची शनिवार, ३० डिसेंबर रोजी वेकोलि वणी क्षेत्राचे क्षेत्रीय महाप्रबंधक आभास सिंग, राजुरा विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, तहसीलदार विजय पवार, नायब तहसीलदार जितेंद्र गादेवार, भाजपाचे अमोल थेरे, मल्लेश बल्ला, मोमीन शेख, विक्की सारसर यांनी पाहणी केली.अमराई वार्डातील भूस्खलनबाधित कुटुंबीयांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना यश आले आहे



या भूस्खलनबाधितांना जागेचे पट्टे मिळवून देण्यासाठी माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी पाठपुरावा केला होता.महसूल व वन विभागाने आपत्तीप्रणव गावाचे पुनर्वसन अंतर्गत अमराई वार्डातील भूस्खलनामुळे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसनाकरीता येथील शासकीय जमीन स. नं. २९/१ आराजी ५९.४७ हे. आर जागेपैकी २.४० हे. आर (६ एकर) जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने १ नोव्हेंबर रोजी निर्णय घेतला आहे.

# केरळ अव्वल तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

## राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचा समारोप

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात यशस्वी आयोजन









### मुलींच्या गटातून विविध क्रीडा प्रकारात अव्वल स्थान प्राप्त केलेले खेळाडू

१०० मीटर आणि २०० मीटर धावणे सिया अभिजित सावंत (भारतीय शालेय परिषद),४०० मीटर धावणे आणि ४०० मीटर अडथळ्याची शर्यत ज्योथीका एम. (केरळ),८०० मीटर धावणे आशा किरण बरला (झारखंड),१५०० मीटर आणि ३००० मीटर धावणे सोनिका राजवाडे (छत्तीसगड),उंच उडी लिस देवा प्रसन्ना एस (तामिळनाडू),बांबू उडी तनु यादव (मध्य प्रदेश),लांब उडी मुबासिना मोहम्मद (लक्षद्विप),तिहेरी उडी जेनिस ट्रीसा रेगी (केरळ),गोळा फेक अनुप्रिया (केरळ),हॅमर थ्रो अनुष्का यादव (उत्तर प्रदेश),भाला फेक वर्षा (हरयाणा),४द१०० रिले आणि ४द४०० रिले दोन्ही स्पर्धेत केरळ,३००० मीटर चालण्याची शर्यत खुशबू यादव (राजस्थान).

### मुलांच्या गटातून विविध क्रीडा प्रकारात अव्वल स्थान प्राप्त केलेले खेळाडू

४०० मीटर धावणे अभिराम पी. (केरळ),८०० मीटर व १५०० मीटर धावणे शहारुख खान (उत्तरप्रदेश),३००० मीटर धावणे बलजीत सिंग (हरयाणा),उंच उडी,लांब उडी आणि तिहेरी उडीत मोहम्मद मुहास्सीन (केरळ),बांबू उडी कवीन राजा एस. (तामिळनाडू),गोळा फेक निखलेश (हरयाणा),थाळी फेक तनिष्क शेवरन (हरयाणा),हॅमर थ्रो नरपत सिंह (राजस्थान),भाला फेक आदित्य (हरयाणा),४द१०० रिले (महाराष्ट्र),४द४०० रिले (केरळ),५००० मीटर चालण्याची शर्यत सचिन (हरयाणा)

### विविध क्रीडा प्रकारात अव्वल स्थान प्राप्त केलेले महाराष्ट्रातील खेळाडू

१०० मीटर तसेच २०० मीटर धावणे जेसन जेम्स कॅस्टिलीनो (महाराष्ट्र),११० मीटर अडथळ्याची शर्यत संदीप विनोदकुमार (महाराष्ट्र),४०० मीटर अडथळ्याची शर्यत अली समिर शेख (महाराष्ट्र),६ कि.मी. क्रॉस कंट्री दशरथ तुकाराम (महाराष्ट्र),११० मीटर अडथळ्याची शर्यत अलिझा आफताब मौला (महाराष्ट्र),थाळी फेक भक्ती तानाजी गावडे (महाराष्ट्र),४ कि.मी. क्रॉस कंट्री साक्षी भास्कर भंडारी (महाराष्ट्र)

### एकापेक्षा अधिक सुवर्ण पदके प्राप्त करणारे खेळाडू

मोहम्मद मुहास्सीन (केरळ) याने उंच उडी,लांब उडी आणि तिहेरी उडीमध्ये तीन सुवर्ण मिळवले. तसेच जेसन जेम्स कॅस्टिलीनो (महाराष्ट्र),शहारुख खान (उत्तरप्रदेश),सिया अभिजित सावंत (भारतीय शालेय परिषद),सोनिका राजवाडे (छत्तीसगड) यांनी देखील प्रत्येकी दोन सुवर्ण पदके प्राप्त करत आपला ठसा उमटविला.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर तालुका क्रीडा संकुल येथे पार पडलेल्या ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत केरळच्या संघाने पदक तालिकेत अव्वल स्थान पटकाविले तर महाराष्ट्राला दुसरे आणि तर हरयाणाच्या संघाला तिसरे स्थान मिळाले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून बल्लारपूर तालुका क्रीडा संकूल येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

केरळच्या संघाला ११ सुवर्ण,५ रौप्य व ६ कास्य अशी एकूण २२ पदके मिळाली तसेच ६० वैयक्तिक व ३६ रिले मिळून ९६ गुण मिळाले. महाराष्ट्राच्या संघाने ९ सुवर्ण,३ रौप्य व ७ कास्य अशी एकूण १९ पदके जिंकून ५३ वैयक्तिक व ३६ रिले असे एकूण ६९ गुण मिळवले. तर हरयानाच्या संघाने ६ सुवर्ण,९ रौप्य व १ कास्य पदकासह एकूण १६ पदकांची कमाई केली. हरयाणाच्यया संघाला ५५ वैयक्तिक व ६ रिले असे ६१ गुण प्राप्त झाले. राज्याचे वने,सांस्कृतिक कार्य,मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून प्रथमच तालुका स्तरावर राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत एकूण ३४ संघांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी ११ संघांनी ४० सुवर्ण पदकांची कमाई केली तर १९ संघांनी पदकतालिकेत स्थान मिळवले. केरळ,महाराष्ट्र व हरयाणा यांच्यानंतर उत्तरप्रदेश ३ सुवर्ण,५ रौप्य व ४ कास्य पदकासह एकूण ३५ गुण,तामिळनाडू २ सुवर्ण,२ रौप्य व ६ कास्य पदकासह एकूण २४ गुण,राजस्थान २ सुवर्ण,२ रौप्य व ४ कास्य पदकासह एकूण २० गुण,छत्तीसगड २ सुवर्ण व १ रौप्य पदकासह एकूण १३ गुण,भारतीय शालेय परिषद २ सुवर्ण व १ कास्य पदकासह एकूण ११ गुण,मध्य प्रदेश १ सुवर्ण व २ रौप्य पदकासह एकूण ११ गुण,झारखंड १ सुवर्ण व १ कास्य पदकासह एकूण ६ गुण,लक्षद्विप १ सुवर्ण पदकासह एकूण ५ गुण,कर्नाटक ६ रौप्य व ५ कास्य पदकासह एकूण २७ गुण,आंध्र प्रदेश १ रौप्य व १ कास्य पदकासह एकूण ४ गुण,तसेच केंद्रीय विद्यालय,उत्तराखंड,पश्चिम बंगाल व पंजाब यांनी प्रत्येकी १ रौप्य पदकासह ३ गुण आणि दिल्ली व चंदीगड यांनी प्रत्येकी १ कास्य पदकासह १-१ गुण मिळवत पदक तालिकेत स्थान मिळवले आहे.याशिवाय चंदिगड,बिहार,सी.बी.एस.सी. वेलफेअर स्पोर्ट्स,दादरा व नगर हवेली,दव कॉलेज मॅनेजिंग,गोवा,गुजरात,हिमाचल प्रदेश,इंटरनॅशनल बोर्ड,आय.पी.एस.सी.,जम्मू काश्मिर,नवोदय विद्यालय,ओडिशा,पद्दूचेरी,तेलंगणा व विद्या भारतीच्या संघांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

# पत्रकारांच्या समस्यांची जाणीव असणारे नेतृत्व-डॉ.विश्वासराव आरोटे

**पत्रकारिता करताना निस्वार्थीपणाची भावना अंगीकारून पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकार संघाचा अमृतवेल वाढविण्याचे काम व ग्रामीण पत्रकारांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करून देणारे नेतृत्व म्हणजे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे हे होय.**



चितळवेढे (ता. अकोले जि. अहमदनगर) या छोट्याशा डोंगर कुशीतील आणि प्रवरामाईच्या तिरावर असलेल्या गावी त्यांचा जन्म झाला. परिस्थिती बेताचीच असल्यामुळे प्राथमिक शिक्षण जन्मगावी पूर्ण केले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण मा. मधुकरराव पिचड माध्यमिक विद्यालय राजुर येथे पूर्ण केले तर महाविद्यालयीन शिक्षण अकोले येथील महाविद्यालयात पूर्ण केले परिस्थिती सामान्य असल्यामुळे शिक्षण घेत असताना सकाळी चितळवेढे येथून दूध घेऊन यायचे नंतर वर्तमानपत्र वाटण्याचे काम करायचे वर्तमानपत्र वाटत असताना वेळ मिळेल तेव्हा ते वाचत असायचे असा नित्यक्रम सुरू झाला. वर्तमानपत्र वाचता वाचता पत्रकारीतेची झालेली ओळख आज त्यांना उच्च पदावर घेऊन गेली.

ग्रामीण भागात वृत्तपत्र पोचवून ग्रामीण भागातील खप वाढवायचा असेल तर त्या भागातील समस्या समजून घेऊन वृत्तपत्रात त्याची मांडणी होणे आवश्यक आहे याची जाणीव विश्वासरावांना झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागातूनच आपल्या पत्रकारीतेचा श्रीगणेशा केला आणि ग्रामीण भागातील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला .आणि ध्येयवेडी स्वप्ने उराशी बाळगून कर्तव्य करत राहिले यावेळी ग्रामीण भागातील वास्तव मांडताना अनेक अडीअडचणी आल्या परंतु मुळातच परंतु मुळातच अकोले तालुक्याला विचारांचा वारसा लाभलेला असल्यामुळे पत्रकारीता क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांशी त्यांची विचारसरणी जुळली. त्यातूनच मार्गदर्शनाची दिशा मिळत गेली .कतृत्व आणि नेतृत्व याचा सुरेख संगम अस्तित्वात आला. लेखणीला चालना देता देता ग्रामीण भागातील वास्तव मांडतांना व दैनिक गावकरी या वृत्तपत्रात काम करत असताना ग्रामीण भागातील पत्रकारांशी त्यांची नाळ जोडली गेली त्यातूनच ग्रामीण समस्यांची उकल त्यांनाच झाली. समस्या सोडवण्यासाठी काही तरी केले पाहिजे या उद्देशाने संघटन बांधणी सुरू केली बातमीदारीत्यांना मोठ्या पदावर घेऊन गेली. वार्ताहर म्हणूनअनेक वृत्तपत्रांमध्ये काम केल्या नंतर तालुका प्रतिनिधी आणि नंतर विभागीय कार्यालयाचे उपसंपादक म्हणून त्यांनी दैनिक गांवकरी'या उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकाची जबाबदारी यशस्वीरीत्या पेलली. गांवकरीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची, या भागातील ग्रामस्थांची विश्वासार्हता जपली. त्यांचे प्रश्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून सातत्याने मांडले. पत्रकारीताकरत असतानाच ग्रामीण भागातील पत्रकारांशी देखीलत्यांची नाळ जोडली गेली. या पत्रकारांच्या समस्या त्यांना आपल्या समस्या वाटू लागल्या. या समस्या सोडविण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे सारखे वाटत होते. त्यांनी ग्रामीण भागात काम करणार्या पत्रकारांची मोट बांधली. सर्वांना बरोबर घेऊन अकोले तालुका ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. या पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांसाठी खर्या अर्थानेकार्य सुरु केले. हे काम करत असतानाच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचेराज्य संघटक संजय भोकरे यांचा संपर्क आला. दोघांचेही ध्येय एकच..पत्रकारांच्या समस्या सातत्याने मांडून त्यासाठी राज्यस्तरावर नव्हे तरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करणे. ध्येय्य एकच असल्याने या जोडगोळीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून एकत्रित काम सुरु केले.

पत्रकारांसाठी चालविल्या जात असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी राज्यस्तरीय अधिवेशने घेतली. जिल्ह्यात, तालुक्यात विविध मेळावेघेतले. राज्यभरातीलसर्व जिल्ह्यातील पत्रकारांना या पत्रकार संघामध्ये सामावून घेतले. प्रत्येकाला संघाचे ओळखपत्र देऊन नवी ओळख दिली. सर्वच जिल्ह्यातील पत्रकारांचा विमा काढून खर्या अर्थाने पत्रकार संघ या पत्रकारांसाठी काम करतअसल्याचा विश्वास निर्माण केला. संघटनेच्या पदाधिकार्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अहमदनगर जिल्ह्याध्यक्ष आणि नंतरराज्य सरचिटणीस या पदावरकाम करण्याची संधी दिली. राज्य कार्यकारिणीवर काम करतानाचत्यांचे काम अतिशय जोमाने सुरु झाले.

स्पर्धा परीक्षांबरोबरच क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या गुणवंतांचा राज्यस्तरावर गौरव पत्रकारसंघाच्या माध्यमातून केला जात आहे. पंडीत श्रीश्रीरविशंकरजी यांनाही पत्रकार संघाने गौरविले आले. हलाखीची परिस्थिती असणार्या पत्रकारांना औषधोपचारासाठी व इतरगरजा भागविण्यासाठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही डॉ.विश्वासराव आरोटे यांनी केला आहे. अशा राज्यभरातून अनेक पत्रकारांना संघटनेने आर्थिक मदत केलीआहे.

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, सुशिलकुमार शिंदे, समाजसेवक अण्णा हजारे, विधानसभेचे माजी सभापती हरिभाऊ बागडे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत आर. आर. पाटील, दिवंगत गोपीनाथ मुंडे, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, माजी मंत्री दिलीप वळसे, पद्माकर वळवी, रामराजे निंबाळकर, बबनराव पाचपुते, बाळासाहेब थोरात, राम शिंदे, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादापाटील, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींकडे त्यांनी सातत्याने पत्रकारांच्या विविध समस्या मांडल्या. पत्रकारांना संरक्षण मिळावे यासाठी संरक्षण कायदा व्हावा यासाठी ते नेहमीच आग्रही राहीले. पत्रकारांवर होणार्या हल्ल्यांचा निषेध करत आरोपींना अटक होईपर्यंत पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही श्रमिक पत्रकारांप्रमाणेच ॲक्रीडीशन कार्ड मिळावे, एस. टी. बस तसेच रेल्वेसारख्या विविध सवलती मिळाव्यात, शासनानेत्यांचा आरोग्य विमा काढावा, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती द्याव्यात, पत्रकारांना निवासासी व्यवस्था उपलब्ध करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न विश्वासराव आरोटे करत आहेत. पत्रकारसंघाने याच मागण्यांसाठी मुंबई येथीलआझाद मैदानावर केलेल्या आंदोलनाची दखल राज्यपाल विद्यासागरराव यांनीही घेतली होती.

त्यांच्या कार्यकाळात अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असुन त्यांनी केलेल्या कार्याचा तो सन्मान आहे.कोणताही पत्रकार असो त्यांना विश्वासराव माऊली म्हणुन संबोधतात त्यामुळे ते अधिक जिव्हाळ्याचे सबंध प्रस्थापीत करतात. त्यांना भरपुर आयुष्य व चांगले आरोग्य मिळो याच वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा!

**नवनाथ जाधव**
**प्रदेश प्रसिद्धी प्रमुख**
**महाराष्ट्र राज्य मराठी**
**पत्रकार संघ मुंबई**

# आश्वासक लढवय्ये प्रेरणादाई नेतृत्व

# वसंत मुंडे,विश्वासराव आरोटे

**ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत संघटनेत काम करणाऱ्या पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयल सुरु आहेत. पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे. यासाठी राज्य मराठी पत्रकार संघाचे आश्वासक लढवय्ये प्रेरणादाई नेतृत्व, प्रदेश अध्यक्ष वसंत मुंढे साहेब व प्रदेश महासचिव विश्वासराव आरोटे साहेब आमचे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला कार्याचा आढावा....!**





गगन भरारीचे वेड पंखात असावं लागतं ,उराशी बाळगलेली स्वप्न पूर्ण करण्यासाठी ध्येयवेडानेपछाडावं लागत ,मनाची व येणाऱ्या संकटावर मात करण्याची मनाची तयारी असावी लागते .प्रतिकूल परिस्थितीला अनुकूलतेची जोड लावत गेलं की अशक्य गोष्टी पण सहज शक्य होत जातात.ज्या पत्रकार संघाच्या कामात आपण लक्ष घालून तन-मन अर्पून श्रद्धेने वाहून घेतल की त्यात दैवरूपी शक्ती पण आपल्या आशीर्वादरुपी वजनाचे माप घालते आहेत अस वाघ ठरणार नाहीत तुम्ही स्वतःला घालून घेतलेल्या मर्यादेला कधीही छेद न देता स्वतःच स्वतःभोवती आखून घेतलेल्या त्या चौकटीत वावरणारे मुंढे साहेब व आरोटे साहेब यांनी राज्यातील बहुसंख्य वृत्तपत्रांचे संपादक तसेच पत्रकार, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सभासद आहेत. राज्यातील मराठवाडा, नागपूर, पश्चिम महाराष्ट्र कोकण, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र,या भागात संघटनेने सभासदांच्या विविध प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने उभारुन हा पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, आज त्याला यश मिळाले आहे. राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून संभाजीनगर,सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी पत्रकार भवन उभारले असून पत्रकारांच्या पाल्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात, उच्च शिक्षणातही सवलती मिळाव्यात तसेच राज्य मराठी पत्रकार संघाचा विस्तार विविध राज्यात करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याबरोबरच राज्यातील पत्रकारांना देशाच्या राजधानीत थांबण्यासाठी पत्रकार भवन उभारले आहे. पुणे, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर याठिकाणी देखील पत्रकार संघाच्या सभासदांसाठी पत्रकार भवन उभारले आहे. सभासदांना संघटनेमार्फत पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण, शासकीय विश्रामगृहांवर टोलनाके, सभासदांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी राखीव कोठा ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहोत. अधिस्वीकृती शासनाच्या मोफत रेल्वे, एस. टी, एअरलाईन, शासकीय विश्श्रामगृहांवर प्राधान्य दिले जाते त्यामुळे पत्रकारांवर आरोग्य, विमा संरक्षण व मोफत प्रवास या तीन राज्य शासनाकडे केला असून ग्रामीण पत्रकारांना या सवलतींचा फायदा देण्याचा प्रयत्न मुंढे आणि आरोटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. संघाचे विविध ठिकाणी शैक्षणिक उपक्रम सुरु असून ग्रामीण भागासह वर्तमान पत्रातील श्रमिक पत्रकार, मुक्त पत्रकार, छायाचित्रकार यांच्या संरक्षणासाठी व लढ्यासाठी संघाने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. संघटना कोणतीही असो संरक्षण, त्यांच्या घेणारी संघटना भविष्यात पत्रकारांना संघटनेमार्फत विभागनिहाय अधिवेशने, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, पत्रकार दिन, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गुणगौरव राज्य ग्रामीण भागातील पत्रकारांनी केलेल्या कार्याची दखल व पाठीवर शाबासकीची थाप नेहमीच आपण देत आले आहेत तसेच संघाने दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदतही दिली आहे दोन्ही साहेबांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक तालुक्यात राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सभासद आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या सोडविण्याचे काम सातत्याने होत आहे. अनेक पत्रकारांना हलाखीच्या परिस्थितीत पत्रकार संघाकडून आर्थिक मदत केली जात आहे. संघाचे सभासदांना अधीस्वीकृत कार्ड मिळवून देण्यासाठी प्रयत्न होत आहेत. समाजातील विविध घटकांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल पत्रकार संघाकडून गौरविण्यात येत आहे यासाठी मा.मुंढे साहेब आरोटे साहेबांचे मार्गदर्शन मिळत आहे. संघामार्फत उत्कृष्ट पत्रकारीता जीवन गौरव पुरस्कार, सांस्कृतिक, पत्रकारिता,राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. तसेच राज्यभरात पत्रकारांची मोट बांधण्यासाठी राज्य संघटक मुंढे व आरोटे साहेब यांच्या कल्पक नेतृत्वातून संघटनेचा विस्तार राज्याच्या पलिकडे नवी दिल्ली पर्यंत अविरतपणे काम सुरु आहे.

ग्रामीण भागात काम करतांना तत्त्वांशी तडजोड न करता ताठ मानेनं पत्रकारिता करणारया , आणि त्यातून येणारया नानाविध संकटांना धैर्याने सामोरं जाणारया पत्रकारांची संख्या महाराष्ट्रात कमी नाही.. मराठवाडा म्हणजे मराठवाड्यातील पत्रकारांसाठी पत्रकार संघाच पत्रकारितेचं विद्यापीठ आसे म्हटले तर वावगे नाही. पत्रकारितेची मूल्यं संस्कार,आणि महत्व वेगळं सांगण्याची गरज नाही म्हणून वसंत मुंडे मागील पंधरा वर्षापासून कार्यरत आहेत. संघटनेत जिल्हाध्यक्ष ते प्रदेश कार्याध्यक्ष पदावर त्यांनी काम केले. शासनाच्या औरंगाबाद विभागीय पत्रकार अधिस्वीकृती समितीचे अध्यक्षपदी संधी मिळाली तेव्हा शासकीय समितीची पत्रकारांची बरोबर खुली चर्चा हा उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात घेतला. तालुका पातळीवरील पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी म्हणून शासनाकडून धोरणात बदल करून घेतला. उपेक्षित वंचित घटकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना आर्थिक पाठबळ उभा करून देण्यात त्यांनी महत्वाची भूमिका निभावली आसताच.तीन वर्षापासून प्रतिमाह व्याख्यानमालेचा उपक्रम पत्रकार संघाच्या माध्यमातून चालवले जातात. अत्यंत उपक्रमशील आणि प्रश्नांची जाण असलेल्या पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. प्रदेश महासचिव म्हणून काम करणारे विश्वासराव आरोटे साहेब संघटन कौशल्य, शांत, संयमी, वैचारिक मांडणी, पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा देण्याची भूमिका सातत्याने घेतली आहे. ग्रामीण भागातून काम करताना पत्रकारांसमोर अडीअडचणींना राज्यस्तरावर मांडून त्या सोडवून घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला. पत्रकारीता क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे पत्रकारांच्या अडचणी समजावून घेत, त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याचा प्रयत्न करीत आलेले आहेत. स्वस्थ असे ते कधीच बसवत नाही. एक उपक्रम संपला, एक गोष्ट सध्या झाली, कि लगेच स्वतःला दुसऱ्या कोणत्यातरी उपक्रमात, कोणत्यातरी गोष्टीत गुंतवून घेण्याचे काम सातत्याने करीत असतात. त्यांचा पिंडच मुळात धडपडीचा आहे.

**कवि कुसुमाग्रज यांनी म्हटल्या प्रमाणे, 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेऊन फक्त लढ म्हणा' या न्यायाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मा.वसंत मुंढे व विश्वासराव आरोटे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली उद्दीष्ट व ध्येय्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे, करीत राहणार आहे. साहेबांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!**

**शांताराम मगर,जिल्हाध्यक्ष**
**ग्रामीण छत्रपती संभाजीनगर**

**शांताराम मगर**
**मो.९४२१४१७५४०**

## राज्य पत्रकार संघाचे सर्वमान्य नेतृत्व

## मा.वसंत मुंडे




राज्य पत्रकार संघाचे सर्वमान्य नेतृत्व मान. वसंत मुंडे सर्वसामान्य नेतृत्व ठरलेल्या व्यक्तींबद्दल विशेष सांगायचे वा लिहायचे म्हणणे निव्वळ औपचारिकता ठरेल. महाराष्ट्र राज्यातच नव्हे तर गोवा, कर्नाटक, गुजरात ते दिल्ली पर्यंत राज्य पत्रकार संघाचे सेनापती पदाचे काटेरी मुकूट परिधान करून सर्वमान्य नेतृत्व हे बिरूद लाभलेल्या मान. वसंत मुंडे साहेबांची पत्रकार सृष्टीच्या प्रत्येक घटकांबाबत असलेली आंतरिक तळमळ सर्वभूत आहे. संघटनेतील प्रत्येक घटकाने ही तळमळ अंगिकारावी व राज्य पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार सृष्टीच्या विकासाकरीता हातभार लावावा हाच खच्या अर्थाने मान. मुंडे साहेबांसारख्या सर्वमान्य नेतृत्वाला दिलेली सलामी ठरेल. राज्यों संघटक मान. संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनात पत्रकार संघ सांभाळण्याची सक्षमता व सहजता लाभलेल्या पहिल्या फळीतील दोन मुत्सद्द्यांना मी अनुभवले आहे. मान. वसंत मुंडे व मान. विश्वासराव आरोटे. कर्तृत्व व नेतृत्व यांचा सहज ताळमेळ व यातून अलंकारीत झालेले सर्वमान्य नेतृत्व वसंत मुंडे यांचे व्यक्तिमत्व पत्रकारांना आदर्शवतठरावे असेच आहे. पत्रकार संघाचे खच्या अर्थाने नेतृत्व करताना,यात कार्य करताना सतत काटेरी मुकुट शिरावर घेऊन मागेपुढे चालावे लागते. प्रचंड ऊर्जा खर्च करावी लागते कारण पत्रकारांचे, पत्रकारितेतील घटकांचे प्रश्न सोडविताना पुढे पुन्हा अनेक प्रश्न उभे ठाकतात व प्रश्नांची उकल करून शासन दरबारी उत्तरे सुदधा आपणासच सादर करावी लागतात. या विचित्र चक्रव्हुहातून स्वत: सोबत संपूर्ण संघाला सा वरून संपूर्ण संघाला सन्मानीत करण्याचे श्रेय मा. मुंडे साहेबांना जाते. यामुळेच ते सर्वमान्य नेतृत्व ठरले आहेत. राज्य पत्रकार संघात Quantity Quality यांची सांगड घालण्यात प्रदेशाध्यक्ष मान, वसंत मुंडे यांचा मोठा वाटा आहे. पत्रकार सृष्टीच्या समस्या शासनस्तरावर सतत भांडून सोडवाव्या लागतात. एकीकडे शासन दरबारी भांडताना दुसरीकडे सामाजिक सहकार्य संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रमातून पदरी पाडून घेण्याचे महतकार्य मान, वसंत मुंडे साहेब यांनी केले आहे. राज्य पत्रकार संघ ३६५ दिवस वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमातून आपली सामाजिक बांधिलकी जोपासत आहे. नुकतीच मा. मुंडे साहेबांनी आपल्या कल्पकतेने केंद्रिय अर्थमंत्रालयास,राज्य शाशनास एक फार्मूला पटवून दिला आहे. यातून वर्तमानपत्र विकत घेणाऱ्या करदात्यांना कर सवलत च वर्तमानपत्रांच्या किंमतीत वाढ होऊन साधली जाणारी विकासश्रृंखला सामील आहे.मान. वसंत मुंडे साहेबांची अभ्यासू वृत्ती, शिस्तप्रियता, कल्पकता, जिदद, मेहनत, क्षमता किंबहुना एकत्रित व्यक्तिमत्व व संघातील हजारो पदाधिकारी व सदस्यांना लाभणारे त्यांचे मार्गदर्शन हे आमचे सौभाग्य. त्यांच्या कथनी व करणीतून वृत्तपत्र सृष्टीतील प्रत्येक घटकाला ऊर्जा मिळत आहे.सर्वमान्य नेतृत्व ठरलेल्या मान. वसंत मुंडे साहेबांना दीर्घकाळ वृत्तपत्र सृष्टीच्या सुरेल आयुष्याकरीता राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून बळ व ऊर्जा मिळणार आहे हे निश्चित.



**प्रा.महेश पानसे**
**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ**
**पूर्व विदर्भ अध्यक्ष**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .